प्रजासत्ताकदिनाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय बाल शौर्य पुरस्कारांची घोषणा झाली आहे. यंदा देशभरातील 18 बालकांना हा पुरस्कार मिळाला आहे. नांदेडच्या पार्डी गावच्या 17 वर्षीय नदाफ एजाज अब्दुल रौफचाही बाल शौर्य पुरस्काराने सन्मान करण्यात येणार आहे. नदाफ हा आहे. त्याने 30 एप्रिल 2017 रोजी तलावात बुडणाऱ्या दोन मुलींचा जीव वाचवला होता. या कामगिरीसाठी त्याचा राष्ट्रीय बाल शौर्य पुरस्कार जाहीर झाला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या बालकांना हा पुरस्कार प्रदान केला जाईल. या वीर बालकांचा चमू प्रजासत्ताक दिनाच्या परेडमध्येही सहभागी होणार आहे.

समयसूचकता, जलद विचार, निःस्वार्थ निर्धार आणि सोबतच्या माणसांप्रती संवेदनशीलता हे महत्वाचे गुण या बालकांनी केलेल्या पराक्रमी कृत्यांमागे होते, अशा शब्दांत पंतप्रधानांनी पुरस्कार विजेते आणि त्यांच्या पालकांचे आभिनंदन केले.

पुरस्कार विजेत्यांचे पराक्रमाचे हे कृत्य, हा अशा कृत्यांचा शेवट असू नये, असे पंतप्रधानांनी सांगितले. आयुष्यात विकास सुरू राहिला पाहिजे, बालकांनी कारकीर्द घडविणे सुरू ठेवले पाहिजे आणि आपल्या सर्वोत्तम क्षमतांसह समाजाची सेवा करणे सुरू ठेवले पाहिजे, असेही ते म्हणाले. पंतप्रधानांच्या हस्ते आजच प्रकाशित झालेल्या 'लाईफ प्रोग्रेशन ऑफ आयसीसीडब्ल्यू नॅशनल ब्रेव्हरी अवॉर्डीज्' या पुस्तकात या पैलुंना स्पर्श करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

